## महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद ,पुणे
## द्वारा आयोजित

**राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2023-2024**

**माध्यमिक गट**

# "मोबाईल कडून पुस्तकांकडे"


**नवोपक्रम सादरकर्ती**

**श्रीमती. भारती युवराज मराठे, सहाय्यक शिक्षिका**

वे.खा.भ. सेवा मंडळ धुळे संचलित,

कमला नेहरू कन्या विद्यालय, नंदुरबार

**मार्गदर्शिका**

**डॉ. नंदा वसावे**

शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यालय ,नंदुरबार

# अनुक्रमणिका


| अ. नं. | तपशील | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | 4 |
| २ | नवोपक्रमाची गरज व महत्व | 4 - 5 |
| ३ | उपक्रमाची उद्दिष्टे | 6 |
| ४ | नवोपक्रमाचे नियोजन | 6 - 9 |
| i | उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण | 6 |
| ii | संबंधित व्यक्तींशी तज्ञांशी चर्चा | 6 |
| iii | आवश्यक उपक्रमांचा विचार | 7 - 8 |
| iv | करावयाच्या कृतींचा क्रम | 8 |
| v | उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण | 8 |
| vi | कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) | 9 |
| vii | उपक्रमासाठी इतरांची मदत | 9 |
| | उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे | 9 |
| ५ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 9 |
| i | पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी | 10 |
| ii | कार्यवाहीदरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन | 10 |
| iii | उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | 10 |
| iv | कार्यवाही करताना आलेल्या अडचणी | 10 |
| v | माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते | 11 - 15 |
| ६ | नवोपक्रमाची यशस्वीता / फलनिष्पत्ती उद्दिष्टानुसार | 16 |
| ७ | समारोप | 17 |
| ८ | संदर्भसूची | 18 |
| ९ | परिशिष्टे | 19 - 22 |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. मराठे भारती युवराज प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला मोबाईल कडून पुस्तकांकडे हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 06/11/2023
स्थळ : नंदुरबार

W.K.Bhagini Seva Mandal Dhulia * K.N.V.Jr.College Nandurbar * Est. 7-6-1959

स्पर्धकाची स्वाक्षरी
नाव : श्रीमती मराठे भारती यु.
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. मराठे भारती युवराज हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला मोबाईल कडून पुस्तकांकडे हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 23-24 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 06/11/2023
स्थळ : नंदुरबार

Head Mistress
Kamala Neharu Kanya Vidyalaya & Junior College,Nandurbar
शाळा/कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी
नाव : श्रीमती वंदना एन. पाटील
शिक्का:

## नवोउपक्रमाचे शीर्षक :- " मोबाईल कडून वाचनाकडे "

### 1)नवोपक्रमाची प्रस्तावना :-

प्राचीन काळापासून वाचन संस्कृतीला महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या जीवनात वाचन खूप महत्त्वाचे आहे , कारण वाचनामुळे आपल्याला ज्ञान मिळते पैशांच्या श्रीमंती पेक्षा ज्ञानाची श्रीमंती खरी मानली जाते. वाचनामुळे आपली भाषा सुधारते. आजच्या स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. आज जीवन गतिमान झाले आहे. काम खूप झाली आहे, आणि वेळ कमी पडतोय या सबबी खाली बरेच विद्यार्थी साहित्याला पारखे झाले. वाचायला त्यांच्याकडे वेळ नाही ज्यांच्याकडे वेळ आहे असे विद्यार्थी सुद्धा वाचत नाही. वाचण्याचा कंटाळा येतो म्हणून बरेच विद्यार्थी वाचन करत नाहीत. पुस्तके ज्ञानरंजक असतात परंतु ज्ञान व मनोरंजन करण्यासाठी पुस्तकाला पर्याय उपलब्ध आहेत ते म्हणजे टीव्ही, मोबाईल, इंटरनेट सह संगणक, चित्रपटगृह, पंचतारांकित हॉटेल व विविध क्लब इत्यादी माध्यमांनी पुस्तकांची जागा घेतली. त्यामुळे हल्ली वाचन संस्कृती उरली नाही असे सर्वत्र ऐकायला येते. विद्यार्थ्यांना अभ्यासापेक्षा टीव्हीवरील कार्टून शो किंवा रियालिटी शोचे आकर्षण वाटते किंवा तासन तास मोबाईल मध्ये गेम खेळायला आवडते.

वाचनाने विचार समृद्ध होतात विचारशक्ती कल्पनाशक्ती वाढतेविद्यार्थी चिंतनशील बनतो पुढे तो स्वतःचे विचार मांडला लागतो. त्याचे विचार सुसंगत असल्यास इतरांना त्याचा फायदा होतो. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी प्रचंड वाचन केले, चिंतन केले, मनन केले. आज त्यांच्या तर्कसंगत विचारांचा संपूर्ण जगाला फायदा होत आहे. वाचनाने मनुष्य न्यानी होतो. ते ज्ञान म्हणजे मूल्यवान संपत्तीच होय. संत तुकाराम महाराज म्हणतात, "आम्ही घरी धन शब्दांचीच रत्ने",अर्थात ग्रंथरूपी न्यानाला ते संपत्ती समजतात. या संपत्तीची बरोबरी सोने रुपये किंवा हिऱ्यांनी होत नाही, म्हणून आम्ही वाचन केले पाहिजे.

### 2) नमोउपक्रमाची गरज व महत्त्व :-

वाचन हे एक ज्ञानार्जनाचे साधन आहे. वाचन हा मने घडविणारा सुसंस्कार आहे. निर्मळ आनंद देणारा आनंद्योग आहे. वाचन ही जीवनभर पुरणारी शिदोरी आहे.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आजचा विद्यार्थी मोबाईल, टीव्ही, संगणक व इंटरनेटच्या भोवती केंद्रित झालेला दिसतो. तास न तास या साधनांचा उपयोग करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःसाठी दररोज चार ओळी वाचायला वेळ नाही. परिणामी संस्कृती अध:पतनास सुरुवात झाली आणि मग पुन्हा सांगायची वेळ आली "वाचाल तर वाचाल".

वाचन लहानपणी ज्ञान देण्याचं काम करत. तारुण्यात शिलरक्षणासाठी विवेक आणि सदभावना
निर्माण करण्याचे काम करते. आजचे विद्यार्थी पाठ्यपुस्तके,

संदर्भ पुस्तके वाचण्यास तयार नाहीत. परीक्षेच्या अगोदर केवळ गाईडवर काम होत आहे. अभ्यासाला वेळ नाही. शॉर्टकटचा काळ असलेला आपणास दिसतो. पूर्वी विद्यार्थी परीक्षेच्या पूर्वी पुस्तकांचा बारकाईने अभ्यास करत होते. आज तस दिसत नाही.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाने सर्व क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात विकास केलेला आपणास दिसतो. त्यात शिक्षण क्षेत्र ही मागे नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे आजच्या शिक्षण प्रणालीचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांच्या विकासाची सुरुवात भाषा विकासावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. कोणत्याही भाषेचा विकास श्रवण, भाषण, वाचन व लेखन या चारही कौशल्यावर आधारित असतो, परंतु वर्गातील अनुभवावरून जाणवतं की आजचा विद्यार्थी वाचनाकडे दुर्लक्ष करतो. विद्यार्थी पुस्तकापासून लांब झालेला दिसतोय. वाचाल तर वाचाल या वाक्यानुसार पुस्तकाचे वाचन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. वाचनाने ज्ञानात वाढ होते, शब्दसंपदेचा विकास होतो, कल्पनाशक्ती प्रगल्भ होते, विचारांना चालना मिळते, आपले मत व विचार प्रभावीपणे मांडता येतात. आजच्या विद्यार्थ्यांना निबंध लेखन, कथालेखन, पुस्तकांचे विश्लेषण व परिच्छेद लेखन अशे अनेक प्रश्न लिहिताना अडचणी

येतात. कारण पुस्तकापासून ते दुरावले गेलेले आहेत. पूर्वी दिवाळीची सुट्टी, उन्हाळ्याची सुट्टी किंवा रिकाम्या वेळेत मुलं विविध प्रकारची पुस्तकं वाचत. आजची मुलं मोबाईल, लॅपटॉप व संगणक यासारख्या माध्यमांमध्ये तासंतास अडकलेली आपणास दिसतात, त्यामुळे त्यांच्या वाईट परिणामांचाही अनुभव येतो. मोबाईल वाईट नाही पण त्यांचा योग्य वापर होणेही गरजेचे आहे. आज मूल पुस्तकापेक्षा मोबाईलवर जास्त अभ्यास करतात त्यामुळे पुस्तक वाचन तर होतच नाही पण भाषेचे बारकावे ही विद्यार्थ्यांना समजत नाही. मुलांना वर्गात त्यांचा आवडता लेखक कोणता, आवडते पुस्तक कोणते, कादंबरी कोणती अशे प्रश्न विचारले असता उत्तर देता येत नाही. इयत्ता नववी व दहावी मध्ये तोंडी परीक्षेसाठी पुस्तक विश्लेषण हा विषय आहे .पण विद्यार्थ्यांना पुस्तकाचे विश्लेषण करता येत नाही कारण पुस्तकच वाचलेलं नसते. त्यामुळे पुस्तकाची माहिती, लेखकाची माहिती विद्यार्थ्यांना देता येत नाही. लेखन कौशल्यशी संबंधित अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना आजच्या अभ्यासक्रमामध्ये आहेत पण वाचन नसल्यामुळे हे प्रश्न त्यांना लिहायला अवघड जातात. शाळेमध्ये सुसज्ज असं ग्रंथालय आहे ग्रंथालयामध्ये विविध पुस्तक आहेत पण आजचा विद्यार्थी ग्रंथालयामध्ये जात नाही.त्याला विविध पुस्तकांची माहिती नाही. विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकाची, वाचनाची आवड निर्माण करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

## नवोपक्रमाचे वेगळेपण :-

वाचनाशी संबंधित अनेक उपक्रम झालेले आहेत. पण या उपक्रमामध्ये आहे त्या परिस्थितीत सहज उपलब्ध होतील अशा साधनांचा वापर केलेला आहे. या उपक्रमाचा वापर सहज म्हणून कोणताही शिक्षक करू शकेलं. साधा,सोपा आणि सहज उपक्रम करायला प्रत्येक शिक्षकाला शक्य असतो व त्याच्यामध्ये सातत्य पण ठेवता येत. हे उपक्रम दैनंदिन शालेय कामकाजामध्ये घेणं सहज शक्य आहे. या उपक्रमाचे वेगळेपण म्हणजे विद्यार्थ्यांना मोबाईल, इंटरनेट, टीव्ही व कार्टून यासारख्या अनेक गोष्टींपासून वाचनाकडे आणणे आहे. पुस्तकांची गोडी लावण्या सोबतच स्वयंअधययन,नोंदी काढणे, चांगल्या मूल्यांची रुजवणुक अशा महत्वपूर्ण गोष्टींचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावणे विद्यार्थ्यांचा नैतिक मुल्यांचा विकास व विद्यार्थ्यांचे चांगले आरोग्य या सर्वांशी संबंधित हा उपक्रम आहे. या उपक्रमासाठी राबविलेले कार्यक्रम विद्यार्थी आनंदाने व आवडीने करतात. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लागलेल्या चांगल्या सवयींचा वापर विद्यार्थ्यांना भविष्यातही होतो.

## नाविन्यता:-

1. हा नवोपक्रम पूर्णपणे नवीन आहे.
2. एकाच वेळी अनेक समस्यांचे निवारण यामुळे शक्य आहे.
3. वाचन कौशल्य सोबत शब्द संपदा , कल्पनाशक्तीचा विकास होतो
4. वर्तमानपत्र वाचण्याची सवय लागते.
5. नोंदी नोंदवण्याच्या सवयी लागतात

या नवोपक्रमासाठी राबविलेले उपक्रम सहज कोणीही करू शकेल तसेच यासाठी आलेला खर्च देखील प्रत्येकाला परवडण्यासारखा आहे.

## 3) नवोपक्रमाचा उध्दीष्टे:-

1. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कमी होण्यामागील कारणांचा शोध घेणे.

2. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लावण्यासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करणे.

3. राबवलेल्या उपक्रमाची परिणामकारकता तपासने.

## 4) नवोपक्रमाचे नियोजन

### i. उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण:-

दैनंदिन अध्ययन व अध्यापन प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना कल्पनाशक्ती, विचारशक्ती,आकलन यावर आधारित प्रश्न विचारले असता असे लक्षात आले की विद्यार्थ्यांना त्याची उत्तरे व्यवस्थित देता येत नाहीत. तसेच शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी व दहावी मध्ये इंग्रजी विषयात वीस गुणांची तोंडी परीक्षा असते. तोंडी परीक्षेसाठी भाषण या कौशल्यावर आधारित पुस्तक विश्लेषण हा प्रश्न पाच गुणांसाठी आहे. ही परीक्षा घेताना बऱ्याच विद्यार्थिनींना पुस्तकाची माहिती देता येत नाही. पुस्तकांचा लेखक किंवा पुस्तकांची नावे असं काहीच सांगता येत नाही. असं का होतं आहे या कारणांचा शोध घेताना असं लक्षात आले की, वाचनाच्या संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये उदासीनता दिसते. रिकाम्या वेळेत, दिवाळीच्या सुट्टीत किंवा उन्हाळ्याच्या सुट्टीत आजच्या विद्यार्थ्याला पुस्तकापेक्षा मोबाईल , टीव्ही , इंटरनेट यामध्ये वेळ घालवायला आवडतो परिणामी स्वयं अध्ययन शब्द संपदा विकास वाचन क्षमता कल्पना व विचार शक्तीचा हवा तेवढा विद्यार्थ्यांमध्ये विकास झालेला दिसत नव्हता. अभ्यासासाठी गाईड व नवनीतचा म्हणजेच रेडिमेड साहित्यांचा खूप मोठ्या प्रमाणामध्ये वापर दिसत होता. ग्रंथालयात जाऊन आवडीने किंवा जिज्ञासा पोटी विद्यार्थी वाचन करताना दिसत नव्हते. शालेय अभ्यासक्रमाचे पुस्तक फक्त परीक्षेपुरता वाचले जात होते. विद्यार्थी स्वयंअध्ययन करताना दिसत नव्हते, दैनंदिन वर्तमानपत्र हे वाचले जात नव्हते. वाचन करून नोंदी काढायची सवय विद्यार्थ्यांमध्ये नव्हती. तसेच आजूबाजूच्या वातावरणात हे लक्षात येत होते की बरेचसे मुलं पुस्तकांपेक्षा मोबाईल कडे जास्त आकर्षित झालेले होते. त्यांना तासन तास मोबाईल मध्ये वेळ घालवायला आवडत होता. मोबाईलचा वाईट परिणाम त्यांच्या मानसिकतेवर आणि शारीरिकतेवर होताना दिसत होता.

### ii. संबंधित व्यक्तींची व तज्ञांशी चर्चा :-

या उपक्रमाबाबत सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना पटेल मॅडम तसेच उप मुख्याध्यापक माननीय एस एन पाटील सर सहकारी शिक्षक पालक व विद्यार्थिनी यांच्याशी नवो उपक्रमाची गरज स्वरूप अंमलबजावणी या अनुषंगाने चर्चा केली. त्यामध्ये खालील मान्यवर व तज्ञ शिक्षक सहभागी होते.

1. डॉ. श्रीमती. एस. एस. बोनगिरवार
2. प्राचार्य. श्री .एस .डी .पाटील
3. ग्रंथपाल. श्री. एच. एस. शिंदे
4. प्रा. श्रीमती. निर्मला अहिरे
5. प्रा.श्रीमती. अश्विनी कदम

### iii. आवश्यक उपक्रमाचा विचार व निर्मिती:-

या उपक्रमामध्ये सर्वात प्रथम विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड लावण्यासाठी विविध कृतीयुक्त उपक्रमाची निवड करणे आवश्यक होते. सहजपणे व कमी खर्चात उपलब्ध असणाऱ्या साहित्यांचा वापर करण्यावर भर देण्यात आला. उदा. वर्तमानपत्र, जुने कात्रण, ग्रंथालयातील पुस्तक तसेच कमी वेळात दररोज वर्गामध्ये शक्य होतील अशे उपक्रम निवडण्यात आले.

## 1. वृत्तपत्रातून परिपाठ :-

यासाठी दैनिक वृत्तपत्रांचा वापर केला गेला. वृत्तपत्रातील दिनविशेष , बोधकथा, वैज्ञानिक घडामोडी व महत्त्वाची माहिती यांचा समावेश करण्यात आला. दररोज वर्गातली एक विद्यार्थिनी परिपाठ सादर करणार

होती.या उपक्रमाचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे विद्यार्थिनींना वर्तमानपत्र वाचनाची व नोंदी काढायची सवय लागणे.

## 2. वाचन भिंत :-

रोजच्या परिपाठासाठी वृत्तपत्रातून कापलेले कात्रणे तसेच विद्यार्थिनींनी जमवलेली महत्त्वाची माहिती व आवश्यक वाटणारी माहिती रोज विद्यार्थिनींनी वाचावी म्हणून वर्गात एक वाचन भिंत केली. त्यावरील नवनवीन गोष्टी विद्यार्थिनींनी वाचावी म्हणून भिंत वर्गाच्या दर्शनीय भागात बनवण्यात आली.

## 3. आठवड्यातील दोन तास ग्रंथालयात :-

ग्रंथालयाची ओळख उपयोग व महत्त्व समजून देण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. सुरुवातीला छोट्या पुस्तकांची ओळख करून दिली गेली. त्यानंतर हळूहळू विद्यार्थिनी आवडीने पुस्तक वाचू लागल्या. विद्यार्थिनींनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर करावा यासाठी आठवड्यातील दोन दोन तास या उपक्रमांतर्गत ग्रंथपाल यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## 4. पुस्तकांचे विश्लेषण :-

या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना त्यांच्या आवडीचे पुस्तक ग्रंथालयातून उपलब्ध करून दिले जात. विद्यार्थिनींना वाचनासाठी ठराविक कालावधी दिला जायचा त्यानंतर एक दिवस वाचलेल्या पुस्तकांवर असलेल्या पुस्तकांचे परीक्षण ही स्पर्धा घेतली जाणार होती. या स्पर्धेत पुस्तकाचे नाव,पुस्तकाचे लेखक, पुस्तकातील आवडलेल्या गोष्टी, पुस्तकातील महत्त्वाचे वैशिष्ट्ये अशासारख्या अनेक घटकांवर चर्चा केली जाणार होती.

## 5. विश्वकोशातून शब्द शोधणे :-

यासाठी विद्यार्थिनींना काही शब्द दिलेले असतात. ते शब्द विश्वकोशाच्या कितव्या खंडात, कितव्या पृष्ठ क्रमांकावर आहेत हे शोधणे अपेक्षित आहे. उदाहरण. औरंगजेब, कापूर, काँक्रीट उत्तर -विश्वकोश खंड क्र. तीन,पृष्ठ क्रमांक अनुक्रमे 157,644,857 यामुळे विद्यार्थिनींना विविध भाषांमधील शब्दकोशांचा, विश्वकोशांचा वापर कसा करावा हे कळाले. शब्दांची माहिती संदर्भ शोधायची सवय त्यांना लागली.

## 6. लेखकांचा परिचय:-

लेखकांचा परिचय व्हावा यासाठी लेखकांचे जीवन चरित्र, साहित्य, काव्य,कथा व कादंबरी इत्यादीचा विद्यार्थिनींना परिचय करून देण्यासाठी त्या लेखकांचे फोटो व पुस्तक टेबलावर मांडून ठेवले जातात. उदाहरणार्थ साने गुरुजी, शिवाजी सावंत,कुसुमाग्रज, ग दि माडगूळकर इत्यादी. यामध्ये लेखकाविषयी v त्याच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखकाबद्दल आत्मीयता निर्माण होऊन त्यांची पुस्तक वाचण्याची जिज्ञासा निर्माण होते.

## 7.पेटी वाचनालय:-

एका छोट्या पेटीत काही पुस्तके भरून वर्गनायकाकडे द्यावीत व त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांना ते पुस्तके वाचनास देऊन परत जमा करावीत. वाचलेल्या पुस्तकावर वर्गामध्ये चर्चा घडवून आणावी.

## 8. कथाकथन स्पर्धा :-

विद्यार्थिनींना त्यांनी वाचलेल्या कथांवर आधारित ही स्पर्धा घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित होते व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि वक्तृत्व कौशल्याचा देखील विकास होतो.

## IV.करावयाच्या कृतीचा क्रम :

1.पूर्व चाचणी मार्फत विद्यार्थी पुस्तकापासून का दुरावली त्या कारणांचा शोध घेतला.

2.निवडक उपक्रमाची निवड करणे.

3.वृत्तपत्रात परिपाठाचे नियोजन करणे.

4.रद्दीतून स्वर्ण हवा या उपक्रमाचे नियोजन करणे.

5.आठवड्यातून दोन दिवस ग्रंथालयात भेट देणे.

6.वाचलेल्या असलेल्या पुस्तकावर पुस्तक विश्लेषण स्पर्धा घेणे.

7.कथाकथन स्पर्धा राबविणे , वर्गात वाचन भिंत तयार करणे.

8.विद्यार्थिनींना वाचन पेटी मार्फत विविध पुस्तक उपलब्ध करून देणे.

9.विद्यार्थिनींना ग्रंथालयातून शब्दकोश विश्वकोश उपलब्ध करून देणे.

10.विद्यार्थिनींची उत्तर चाचणी घेणे व विश्लेषण करणे.

## V.उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

उपक्रमानंतर निरीक्षण केले असता असे लक्षात आले की विद्यार्थिनींना वाचण्याची गोडी लागलेली होती. वर्गामध्ये चर्चेच्या माध्यमातून समजले विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे पुस्तक तसेच अभ्यासक्रम पूरक पुस्तके, संदर्भ पुस्तके वाचू लागल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून विद्यार्थिनीचा शब्दसंग्रहाचा विकास होऊ लागला. कल्पनाशक्ती वर आधारित विविध प्रश्न उदा. निबंध लेखन, कथा लेखन, संवाद लेखन इत्यादी सारखे प्रश्न पूर्वीपेक्षा चांगल्या पद्धतीने सोडवू लागल्या. विद्यार्थिनीचे ग्रंथालयात जाण्याचे व पुस्तके काढण्याचे प्रमाण वाढू लागले. संदर्भ पुस्तके, कथा काव्य व विश्वकोशाचा वापर विद्यार्थ्यांकडून होऊ लागला. सुट्टीत बऱ्याच मुली विविध पुस्तक वाचू लागल्या. वाचन भिंत, वर्तमानपत्रातून परिपाठ व रद्दीतून सुवर्ण ह्या उपक्रमाचा खूप फायदा झाला.

## VI.कार्यवाहीचे टप्पे:-

सदर नवोपक्रम कमला नेहरू कन्या विद्यालय, नंदुरबार येथील इयत्ता 9 वी तुकडी- ड च्या विद्यार्थिनी साठी 2023-24 मध्ये दिनांक 1 जुलै ते 30 ऑक्टोबर पर्यंत राबविले.

### < वेळापत्रक >

| | | |
|---|---|---|
| 1. | 1 जुलै ते 25 जुलै | मुख्याध्यापक, ग्रंथपाल व सहकारी शिक्षक यांच्याशी चर्चा व विचारविनिमय . |
| 2. | 26 जुलै ते 5 ऑगस्ट | पडताळा सूची तयार करणे व पूर्व पडताळा सूची सोडविणे. |
| 3. | 6 ऑगस्ट ते 10 ऑगस्ट | उपक्रम ठरविणे. |
| 4. | 11 सप्टेंबर ते 25 सप्टेंबर | उपक्रमाची प्रत्यक्षात अंमलबजावणी. |
| 5. | 26 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर | उत्तर पडताळा सूची सोडविणे. |
| 6. | 1 ऑक्टोंबर ते 30 ऑक्टोंबर | नवोपक्रम व लेखन सादरीकरण. |

## VII.नवउपक्रमासाठी सहकार्य व मार्गदर्शन :-

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार प्राचार्य माननीय श्री. भटकर साहेब ,माननीय वंदना पवार मॅडम (जेष्ठ अधिव्याख्याता, नंदुरबार ),श्री. चव्हाण सर (अधिव्याख्याता डायट, नंदुरबार) व इतर सन्माननीय अधिव्याख्याते यांचे अनमोल मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली. ई साहित्य वापरत असलेले राज्यभरातील सर्व शिक्षक यांचे प्रोत्साहन मिळाले .या उपक्रमासाठी कै.कमलाबाई अजमेरा अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य पाटील सर तसेच डॉ. एस. एस. बोनगिरवार मॅडम, डॉ.शिंदे मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले व प्रेरणा मिळाली तसेच कमला नेहरू कन्या विद्यालयाचे ग्रंथपाल श्री शिंदे सर यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले.

## VIII.नवोपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :-

1. राबविण्यात आलेले उपक्रम व त्यांचे फोटो
2. पाण्यात आलेले उपक्रम उपक्रमाचा व्हिडिओ
3. सदर उपक्रमासाठी तयार केलेले प्रश्नावली
4. पूर्व चाचणी व उत्तर चाचणीचे गुणदान तक्ता

# 5.नवोपक्रमाची कार्यपद्धती :-

## I.उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षणे व नोंदी :-

उपक्रमपूर्व स्थितीमध्ये निरीक्षण केले असता विद्यार्थ्यांनिना पुस्तकांपेक्षा जास्तीत जास्त वेळ मोबाईल, टीव्ही, इंटरनेटसारख्या माध्यमांमध्ये घालवायला आवडत होता. मोबाईलचा वापर विद्यार्थीनीकडून खूप जास्त प्रमाणात केला जात होता. वाचना प्रति विद्यार्थ्यांमध्ये उदासींनता होती.अभ्यासक्रमाची पुस्तके विद्यार्थिनींना वाचायला आवडत नव्हती. परीक्षेसाठी रेडिमेड साहित्य म्हणजे गाईडचा वापर केला जात होता.ग्रंथालयाचा रजिस्टर नोंदीवरून लक्षात येत होते ती खूप कमी विद्यार्थिनी ग्रंथालयातून पुस्तक काढत होत्या. वर्गात चर्चा केल्यावर लक्षात आले की विद्यार्थिनींना संदर्भ पुस्तकाबद्दल, पुस्तकांविषयी आवड कमी होती.त्याचप्रमाणे वर्तमानपत्र वाचनाऱ्या विद्यार्थिनीचे प्रमाण फारच कमी होते. वाचनाची सवय, नोंदी काढणे, स्वयं अध्ययन यासारख्या सवयी विद्यार्थ्यांमध्ये खूपच कमी प्रमाणात दिसत होत्या.

## II.कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :-

1.शालेय वातावरणामध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

2.उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना वाचनाची गोडी वाटू लागली.

3.विद्यार्थिनीं आवडीने उपक्रमात सहभागी होऊ लागल्या.

4.शब्दकोश व विश्वकोशाचा वापर करू लागल्या.

5.विद्यार्थिनींना वर्तमानपत्र वाचनाची गोडी लागली व नोंदी काढण्याची सवय देखील लागली.

6.विद्यार्थिनींना कात्रणे जमा करण्याची सवय लागली.

7.स्वयम अध्ययनाच्या सवय लागली.

8.विद्यार्थिनींचा ग्रंथालयातील वापर व पुस्तक वाचण्याचे प्रमाण वाढले.

9.वाचनामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास झाला.

10.रिकाम्या वेळेत व सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थिनींनी उत्साहाने पुस्तके वाचू लागल्या.

11. विद्यार्थिनींचे मोबाईल वापरायचे प्रमाण कमी झाले.

## III.उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :-

1.विद्यार्थिनी मधील वाचनाची भीती कमी झाली.

2. विद्यार्थिनीमध्ये वाचन कौशल्याचा विकास झाला.

3. विद्यार्थिनींमध्ये स्वयमअध्ययनाचीसवय लागली.

4. विद्यार्थिनीमध्ये शब्द संपत्तीचा विकास झाला.

5. पुस्तकांबद्दलची उदासीनता नाहीशी झाली.

6.विद्यार्थिनीच्या वाचनामध्ये ओघवतेपणा पण आला.

7. विद्यार्थ्यांमध्ये व मोबाईल वापरायचे प्रमाण कमी झाले.

8. विद्यार्थिनी ग्रंथालयाचा वापर करू लागल्या.

9. स्वाध्याय सोडवण्यासाठी विद्यार्थिनी अभ्यासक्रमाचे पुस्तके वाचू लागल्या.

10. विद्यार्थिनीच्या कल्पनाशक्ती व विचार शक्तीचा विकास झाला.

## IV.कार्यवाहीत आलेल्या अडचणी :-

शालेय अभ्यासक्रमासोबत उपक्रम राबवण्यासाठी वेळेचे नियोजन करताना काही अडचणी आल्या. पण सहकारी शिक्षकांच्या मदतीने त्यातून मार्ग काढता आला. तसेच विद्यार्थिनींना मोबाईल ,इंटरनेट व टीव्ही यासारख्या माध्यमातून वाचनाची गोडी लावणे अवघड जरी वाटत असले तरी योग्य त्या उपक्रमाची निवड केल्यामुळे विद्यार्थ्यांनी आवडीने व आनंदाने या उपक्रमात सहभागी झाल्या.

## V.माहितीचे विश्लेषण आलेख व तक्ते :-

पडताळा सूची सोडविण्यासाठी निवडण्यात आलेल्या कमला नेहरू कन्या विद्यालयातील इयत्ता 9 वी ड च्या 50 विद्यार्थिनींच्या नावांची यादी.

| विद्यार्थिनींच नाव | |
|---|---|
| 1. | मोरे मयुरी अरुण |
| 2. | खरताडे नेहा रवींद्र |
| 3. | देसाई कल्याणी मंगल |
| 4. | वळवी दिव्या किसन |
| 5. | भिल पुनम कृष्ण |
| 6. | पाडवी दिपाली वसंत |
| 7. | वळवी निकिता विनेश |
| 8. | पाडवी जागृती नितीन |
| 9. | नाईक अलका नेहरू |
| 10. | वळवी अलका सुरेश |
| 11. | पाडवी दिव्या रवींद्र |
| 12. | ठाकरे रवीता रवींद्र |
| 13. | पाडवी दीपिका दीपक |
| 14. | वळवी ओमी रमेश |
| 15. | भिल धनलक्ष्मी जाधव |
| 16. | ठाकरे मोगरा रवींद्र |
| 17. | ठाकरे लक्ष्मी गुलाबसिंग |
| 18. | वडवी पूजा जगलाल |
| 19. | पाडवी मंगला पिंट्या |
| 20. | ठाकरे भारती हरीशचंद्र |
| 21. | भिल रविता कैलास |
| 22. | भरवाड पायल पोपट |
| 23. | भरवाड आरती रतिलाल |
| 24. | खैरनार जयश्री शांताराम |
| 25. | प्रजापती सोनी राजकुमार |
| 26. | पाटील नंदिनी धनराज |

| | |
|---|---|
| 27. | शिंदे दिपाली राजू |
| 28. | ठाकरे लक्ष्मी जंगल्या |
| 29. | गावित नंदिनी वसंत |
| 30. | पवार छाया जॉनी |
| 31. | साळुंखे अश्विनी वैभव |
| 32. | ठाकरे पायल राकेश |
| 33. | मराठे पल्लवी संजय |
| 34. | पटेल कृतिका शरद |
| 35. | वसावे वैशाली मनोज |
| 36. | सूर्यवंशी देवयानी विजय |
| 37. | चौरे कल्याण अजय |
| 38. | ठाकरे दिव्या विजय |
| 39. | पाटील डिंपल मुकेश |
| 40. | मराठे कावेरी ईश्वर |
| 41. | पाडवी गायत्री संजय |
| 42. | ठाकरे संध्या खंड्या |
| 43. | वळवी अमरावती धरमदास |
| 44. | पाडवी विद्या पूना |
| 45. | मराठे गायत्री अशोक |
| 46. | जव्हेरी माधवी अश्विन |
| 47. | डोंगरे मयुरी सचिन |
| 48. | जोशी तन्वी गणेश |
| 49. | भोई योगिता सुरेश |
| 50. | शिंदे वैशाली किरण |

# पडताळा सूची


| | | पूर्व सूची | | उत्तर सूची | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | विधाने. | होय | नाही | होय | नाही |
| 1. | तुम्हाला पुस्तकं वाचायला आवडतात का? | 13 | 37 | 48 | 02 |
| 2. | तुम्हाला मोबाईल वापरायला आवडतो का? | 48 | 02 | 22 | 28 |
| 3. | संदर्भ पुस्तकांचे वाचन करतात का? | 10 | 40 | 34 | 16 |
| 4. | ग्रंथालयातील पुस्तकं काढतात का? | 14 | 36 | 42 | 08 |
| 5. | वर्तमानपत्र वाचायला आवडते का? | 12 | 38 | 40 | 10 |
| 6. | सुट्टीच्या कालावधीत अवांतर वाचन करतात का? | 09 | 41 | 45 | 05 |
| 7. | पुस्तक वाचन करून स्वाध्याय पूर्ण करतात का? | 13 | 37 | 38 | 12 |
| 8. | परीक्षेच्या व्यतिरिक्त शालेय अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तक वाचतात का? | 11 | 39 | 36 | 14 |
| 9. | उपयोजित लेखन करताना अडचणी येतात का? | 46 | 04 | 08 | 42 |
| 10. | वाचन करून महत्त्वाच्या नोंदी काढतात का? | 12 | 38 | 38 | 12 |

## माहितीचे विश्लेषण :-

सदर उपक्रमात मिळालेल्या माहितीच्या आधारे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी या तंत्राचा वापर करण्यात आला. यामध्ये पूर्व पडताळा सूची व उत्तर पडताळा सूची यामधील विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाच्या आधारे शेकडेवारी काढण्यात आली.

## पडताळा सूची प्रतिसाद

| | | प्रतिसाद | |
|---|---|---|---|
| नं. | विधान | पूर्व सूची | उत्तर सूची |
| 1. | पुस्तक वाचनाचे प्रमाण | 26% | 96% |
| 2. | मोबाईल वापरायचे प्रमाण | 96% | 44% |
| 3. | संदर्भ पुस्तक वाचण्याचे प्रमाण | 20% | 68% |
| 4. | ग्रंथात ग्रंथालयातील पुस्तक काढण्याचे प्रमाण | 28%. | 84% |
| 5. | वर्तमानपत्र वाचण्याचे प्रमाण | 24% | 80% |
| 6. | सुट्टीतील वाचनाचे प्रमाण | 18% | 18% |
| 7. | पुस्तक वाचून स्वाध्याय करण्याचे प्रमाण | 26% | 76% |
| 8. | परीक्षेच्या व्यतिरिक्त अभ्यासक्रम पुस्तक वाचण्याचे प्रमाण | 22% | 72% |
| 9. | उपयोजित लेखनात येणाऱ्या अडचणींचे प्रमाण | 92% | 16% |
| 10. | नोंदी काढण्याचे प्रमाण | 24% | 76% |



## अर्थनिर्वचन :-

### विधान 1 :-

पूर्व पडताळा सूचीनुसार विद्यार्थिनींचे पुस्तक वाचनाचे प्रमाण 26% इतकेच होते उपक्रमानंतर हे प्रमाण वाढले. 96% टक्के विद्यार्थ्यांनी पुस्तकं वाचू लागल्याI.

### विधान 2 :-

उपक्रमापूर्वी 96% टक्के विद्यार्थिनी मोबाईल वापरत होत्या उपक्रमानंतर हे प्रमाण कमी होऊन 44 टक्क्यावर आले.

### विधान 3 :-

उपक्रमापूर्वी 20 % विद्यार्थ्यांनी संदर्भ पुस्तकांचे वाचन करत होत्या उपक्रमानंतर हे प्रमाण 80%पर्यंत वाढले.

### विधान 4 :-

उपक्रमापूर्वी फक्त 30% विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा वापर करत होत्या उपक्रमानंतर हे प्रमाण 60 % पर्यंत वाढले.

### विधान 5 :-

उपक्रमापूर्वी वर्तमानपत्राचे वाचन 24 % विद्यार्थ्यांनी करत होत्या उपक्रमानंतर हे प्रमाण 80 % पर्यंत वाढले.

### विधान 6 :-

उपक्रमापूर्वी सुट्टीत किंवा रिकाम्या वेळेत 18 % विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन करत होत्या. उपक्रमानंतर हे प्रमाण 90 % पर्यंत वाढले.

### विधान 7 :-

पुस्तक वाचून स्वाध्याय करण्याचे प्रमाण 26% होते उपक्रमानंतर हे प्रमाण वाढवून 76% टक्क्यावर आले.

### विधान 8 :-

उपक्रमापूर्वी परीक्षेच्या व्यतिरिक्त अभ्यासक्रमाचे पुस्तक वाचण्याचे प्रमाण फक्त 22 % होते. उपक्रमानंतर हे प्रमाण वाढवून 72% टक्के झाले.

### विधान 9 :-

उपक्रमापूर्वी उपयोजित लेखनात 92 % विद्यार्थ्यांनी अडचणी येत होत्या. उपक्रमानंतर प्रमाण कमी होऊन 16 आले.

### विधान 10 :-

उपक्रमापूर्वी महत्त्वाच्या मुद्द्यांच्या नोंदी काढण्याचे प्रमाण फक्त १२% होते उपक्रमानंतर हे प्रमाण वाढवून वर आले.काढण्याचे प्रमाण फक्त १२% होते उपक्रमानंतर हे प्रमाण वाढवून वर आले.

## नवोपक्रमाची फलनिष्पत्ती व यशस्वीतता :-

उपक्रम राबवण्यापूर्वी इयत्ता नववीच्या 50 विद्यार्थ्यांनिन मध्ये पुस्तक वाचना प्रति खूप मोठ्या प्रमाणमध्ये उदासीनता दिसत होती. त्यांचा जास्तीत जास्त कल मोबाईल कडे असलेला दिसत होता.उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थिनीनमध्ये सकारात्मक बदल झालेला दिसला.

1. उपक्रमानंतर विद्यार्थिनींच्या वाचनाचे प्रमाण वाढले. विद्यार्थिनी आवडीने विविध पुस्तकाचे वाचन करू लागल्या.
2. ग्रंथालयातील रजिस्टर नोंदीवरून विद्यार्थिनींचे पुस्तक काढण्याचे प्रमाण वाढलेले दिसले.
3. विद्यार्थिनी स्वाध्याय सोडवितांना पुस्तक व संदर्भ पुस्तकांचे वाचन करून स्वाध्याय सोडू लागल्या.
4. नवीन शब्द शोधण्यासाठी विश्वकोश, शब्दकोशाचा विद्यार्थिनी वापर करू लागल्या.
5. वर्तमानपत्रातून परिपाठ या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना वर्तमानपत्र वाचण्याची सवय लागली तसेच त्यामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास व स्टेजडेरिंग देखील वाढली.
6. रिकाम्या वेळेत किंवा सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थिनीअवांतर पुस्तके वाचू लागल्या.
7. वाचनामुळे विद्यार्थिनी विविध स्पर्धेत आत्मविश्वासाने सहभागी होऊ लागल्या.उदा. कथाकथन स्पर्धा, पुस्तक विश्लेषण स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी
8. महत्त्वाच्या मुद्द्यांच्या नोंदी काढण्याची सवय विद्यार्थिनींना लागली.
9. कात्रन कापून संग्रहित करण्याची सवय विद्यार्थिनींना लागली.
10. विद्यार्थिनींच्या शब्द संपत्तीचा विकास झाला.
11. विद्यार्थिनीच्या कल्पनाशक्ती ,विचार शक्ती यांचा विकास झाला.
12. वाचन कौशल्य सोबत श्रवण, लेखन व भाषण कौशल्याचा ही विकास झाला.
13. विद्यार्थिनींचे मोबाईल वापरण्याचे प्रमाण खूप कमी झाले.
14. उपयोजित लेखनातील बऱ्याच अडचणी कमी झाल्या.
15. वाचन भिंतीमुळे विद्यार्थिनींच्या ज्ञानात भर पडली.
16. इतर वर्गातील विद्यार्थिनींनाही प्रेरणा मिळाली.
17. विद्यार्थिनींना अभ्यासाची गोडी वाटू लागली. विद्यार्थी आनंदाने उत्साहाने अभ्यास करू लागल्या.
18. वर्गात सकारात्मक वातावरण निर्मिती झाली.
19. चांगल्या पुस्तक वाचनामुळे नैतिक मूल्यांची रुजवणूक विद्यार्थिनींमध्ये झाली.
20. पुस्तक विद्यार्थिनींचे मित्र बनले.

## समारोप :-

सध्या आसपास अनेक मनोरंजनाची साधने उपलब्ध आहेत. दूरदर्शन, संगणक व त्यावर खेळले जाणारे खेळ, मोबाईल वरील खेळ असे साधने आपल्याला मानसिक आनंद देतात परंतु मोबाईल चे जेवढे फायदे आहेत तेवढे तोटेही असलेले आपणास दिसतात. आजच्या परिस्थितीत प्रत्येक मुलाच्या हातात मोबाईल दिसतो व त्यात तो गुंतलेला दिसतो. त्याचे होणारे विपरीत परिणाम आपणास सर्वांना माहित आहे. वर्गातही विद्यार्थी पुस्तक, वाचन, अभ्यासापासून दूरावलेला दिसत दिसतो, म्हणून विद्यार्थिनींना पुस्तकांची गोडी लावण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला. शाळेच्या मुख्याध्यापिका,सहकारी शिक्षक, ग्रंथपाल व विद्यार्थ्यांच्या मदतीने हा उपक्रम यशस्वीरित्या राबविता आला. विद्यार्थिनींमध्ये ही सकारात्मक बदल दिसला विद्यार्थिनींनी पुस्तकांकडे वळल्या, वाचन करू लागल्या, नोंदी काढू लागल्या व त्यांना स्वयं अध्ययनाची सवय लागलेली दिसली. हा उपक्रम एका वर्गासाठी जरी राबविला असला तरी निश्चितच त्याचा फायदा इतर वर्ग व इतर शाळांसाठी नक्कीच होईल वाचनामुळे सामान्य ज्ञान वाढते. आपल्याला जर वाचनाची आवड असेल तर मित्रमंडळी किंवा लोकांमध्ये वावरताना आपण एखाद्या विषयावरील चर्चेत आपले मुद्दे योग्य प्रकारे व ठळकपणे मांडू शकतो.वाचनाचा आनंद लुटा. आपल्याला आवडणाऱ्या विषयापासून सुरुवात करा. सवय आपोआप लागेल.

## संदर्भ ग्रंथ :-


1. प्रा. एम. जी. माळी ( 1968) : ग्रामीण शिक्षणाची नवी दिशा व काही प्रयोग. नीलकंठ प्रकाशन,पुणे

2. शिवाजी बोरसाटे( 2005): शैक्षणिक प्रकल्प नियोजन व कार्यवाही .भाऊसाहेब शंकर फास्के प्रकाशन, कोल्हापूर

3. प्रतिभा भराडे( 2005) शैक्षणिक प्रकल्प नवोपक्रम. सौरभ प्रकाशन, पुणे

4. डॉ.मंगला रमेश वरखेडे (2006) प्रकल्प अभ्यास आणि शैक्षणिक नवोपक्रम. ब्रेन टॉनिक प्रकाशन, नाशिक

5.प्रा. अरविंद पाटोळे (2006) प्रकल्पातून भाषिक विकास. आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे

6. अहिर मीना, सोनवणे संभाजी आणि काटे रामदास (2018 )कृती संशोधन व नवोपक्रम. पायल पब्लिकेशन

7.करंदीकर सुरेश (2006 )कृती संशोधन व नवोपक्रम. फडके प्रकाशन

गाडगे स्वाती( 2006) कृती संशोधन व 8.नवोपक्रम फडके प्रकाशन, कोल्हापूर

9.भंगाळे शैलजा (2019 )कृती संशोधन. प्रशांत पब्लिकेशन, पुणे

10.भिंताडे वी. रा. (2018) शैक्षणिक संशोधन पद्धती. दुसरी आवृत्ती, डायमंड पब्लिकेशन्स

11.Diksha platforms website :https:// diksha.gon. in/

Marathi vishwakosh official website :https/12.Marathivishwakoah.org/

NCERT, New Delhi official website :https// ncert.nic.in

13.SCERT Maharashtra, Pune official YouTube channel :

https: www.youTube com @ SCERT Maharashtra

# वृत्तपत्रातून परिपाठ सादर करताना विद्यार्थिनी



# वाचन भिंत पाहताना विद्यार्थिनी





## ग्रंथालय भेट उपक्रम



## पुस्तक विश्लेषण सादर करताना विद्यार्थिनी



## रद्दीतून स्वर्ण ह्या उपक्रमाचे सादरीकरण करताना विद्यार्थिनी



## कथाकथन स्पर्धेत  सादरीकरण करताना विद्यार्थिनी

